# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.08.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- राज्यातील शेतकऱ्यांचे कृषी विम्यासह कांदा, कापूस, सोयाबीन संबंधी प्रश्न सोड विण्याची केंद्रीय कृषी मंत्र्यांची ग्वाही.
- परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन
- रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन
- महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचं वितरण

  आणि
- ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांचं निपाणी इथं निधन

**कृषी महोत्सव**

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा प्रारंभ काल केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यातल्या शेतकऱ्यांपुढे सध्या कांदा, कापूस, सोयाबीन, दूध आणि दूध पावडर हे गंभीर प्रश्न आहेत. ते सोडवण्यासाठी केंद्रीय पातळीवर बैठक घ्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली. तर राज्यातल्या शेतकऱ्यांचे कांदा, कापूस, सोयाबीन सह अन्य प्रश्न सोडवण्यासाठी बैठक घेतली जाईल, अशी ग्वाही चौहान यांनी यावेळी दिली. राज्य शासनाच्या कृषी विभागानं हे प्रदर्शन आयोजित केलं असून ते 25 तारखेपर्यंत चालणार आहे. प्रदर्शनात परिसंवाद, औजारं, शेतमाल, तसंच पशू प्रदर्शन आणि विक्री, रानभाजी महोत्सव, ड्रोन द्वारे फवारणी प्रात्यक्षिक, खाद्य महोत्सव अशी कार्यक्रमांची रेलचेल आहे.

**मुख्यमंत्री**

'रत्नागिरी विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याच्या पर्यटनाचं नवं दार खुलं करण्याचा श्रीगणेशा आहे. रत्नागिरी जिल्हा पर्यटनासाठीचं केंद्र  झाला पाहिजे. त्यासाठी हा विमानतळ महत्त्वाचा ठरेल, असं मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रत्नागिरी

विमानतळाच्या नवीन प्रवासी टर्मिनल इमारतीचं भूमिपूजन करताना काल व्यक्त केलं. 'माझी लाडकी बहीण ही योजना काटकसरीनं घर चालवणाऱ्या महिलांना हातभार लावण्यासाठी आणली आहे. महिला सक्षम झाल्या तर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल,' असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी काल रत्नागिरी इथंच महिला सशक्तीकरण अभियानाच्या अंतर्गत 'लाडकी बहीण' योजनेच्या प्रसारासाठी आयोजित महिला मेळाव्यात व्यक्त केला. विविध योजनांच्या लाभार्थ्यांना या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचं वितरण करण्यात आलं. रत्नागिरीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचं लोकनेते श्यामराव पेजे असं नामकरण आणि इमारतीचं लोकार्पणही काल मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते झालं. 'लोकनेते श्यामराव पेजे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय हे युवकांना प्रेरणा देणारं चालतं-बोलतं स्मारक ठरेल,' असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**कोपरगाव विकास**

अहमदनगर जिल्ह्यातल्या कोपरगाव तालुक्यात 300 कोटी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ तसेच लोकार्पण सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत काल पार पडला. सहकार आणि शिक्षण या राज्याला दिशा देण्याऱ्या कामात अहमदनगर जिल्ह्याचा सिंहाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार पवार यांनी काढले.

**मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण**

हिंगोली जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत आतापर्यंत 2 हजार 810 उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. तर 97 उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाले आहेत.
मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून खाजगी आणि शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. तर प्रशिक्षणार्थींना कामाच्या अनुभवाबरोबरच विद्यावेतन मिळणार आहे.

**राज्यसभा**

राज्यसभेच्या राज्यातल्या दोन रिक्त जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दोनच अर्ज आल्यामुळे राज्यातली ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. भाजपाकडून धैर्यशील पाटील तर राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून नितीन पाटील यांनी आपला अर्ज दाखल केला.

**बदलापूर**

बदलापूर अत्याचार प्रकरणाचे पडसाद काल राज्यात सर्वत्र उमटले. या प्रकरणतील आरोपी अक्षय शिंदे याला काल ठाणे न्यायालयासमोर उभं करण्यात आलं. त्याला 26 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर 22 आंदोलन कर्त्यांना न्यायालयानं 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे. बदलापूरमधल्या शाळेचं संचालक मंडळ बरखास्त करून त्यावर प्रशासकाची नियुक्ती

करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. महिला आणि बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुंबई उपनगरातल्या विविध शाळा महाविद्यालय आणि शासकीय वसतिगृह इथं महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक संस्थानी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि मुंबई उपनगरमधल्या प्रत्येक महाविद्यालयांमध्ये सप्टेंबर पासून स्व-सरंक्षणाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीची बैठक घेऊन जिल्ह्यातल्या शाळांमधल्या सुरक्षितता व्यवस्थांचा आढावा घेतला. सर्व शाळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी गांभीर्यपूर्वक कार्यरत राहावं, असे निर्देश सांगली जिल्हाधिकारी डॉक्टर राजा दयानिधी यांनी दिले. बदलापूरमधील घटना दुर्भाग्यपूर्ण असून, या घटनेतल्या दोषीला फाशीची शिक्षा मिळावी, यासाठी प्रयत्न केले जातील,' अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी रत्नागिरीमध्ये बोलतांना दिली. दरम्यान, बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीनं येत्या शनिवारी 24 तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. महाविकास आघाडीच्या काल झालेल्या बैठकीत प्रस्तावित जागावाटपाबद्दलची चर्चा रद्द करून राज्यातल्या महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना आणि महिला सुरक्षेवर चर्चा करण्यात आली. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना बदलापूरच्या घटनेवर संताप व्यक्त करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्यात महिला अत्याचारांचं प्रमाण वाढल्याचा आरोप केला.

**नक्षली**

गडचिरोलीत खून, चकमकी आणि जाळपोळीच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेली जहाल नक्षलवादी संगीता पुसू हिनं काल पोलिसांसमोर शरणागती पत्करली. संगीतावर शासनानं सहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. अन्य एका घटनेत गडचिरोली पोलिसांनी एका नक्षल समर्थकास अटक केली. प्रमोद कोडापे नावाच्या या समर्थकावर 2 लाखांचं बक्षीस असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**उजनी**

सोलापूर जिल्ह्यातल्या उजनी धरण परिसरात विकसित करण्यात येणाऱ्या उजनी पर्यटन आराखड्यासाठी आवश्यक 280 कोटी रुपयांच्या कामांना राज्यशासनाच्या उच्च अधिकार समितीनं काल मान्यता दिली. त्यामुळे उजनी धरण परिसरात पर्यटन क्षेत्र विकास कामाला आता गती मिळणार आहे.

**पुरस्कार**

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचं वितरण काल मुंबईत वरळी इथं दिमाखदार सोहोळ्यात करण्यात आला. 2024 चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार गायिका अनुराधा पौडवाल यांना देण्यात आला. अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना चित्रपटांसाठीचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार आणि

कंठसंगीतासाठी गायक सुदेश भोसले यांना प्रदान करण्यात आला. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार 2023 शिवाजी साटम, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार 2023, दिग्पाल लांजेकर यांना प्रदान करण्यात आला. 2023 चा राज कपूर जीवनगौरव पुरस्कार आशा पारेख यांना तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार एन चंद्रा यांना प्रदान करण्यात आला. राज्यातील नागरिकांच्या वतीनं दिले जाणारे हे पुरस्कार अतिशय अनमोल असल्याची भावना सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

**मोरे**

ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांचं निपाणी इथं काल पहाटे निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. बोली भाषेतील लिखाणासाठी त्यांना अनेक पुरस्कार लाभले. सतरा कादंबऱ्या,सतरा कथासंग्रह,चार ललित लेखसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. निपाणी इथल्या तंबाकू कामगार महिला, डोंबारी, टॅक्सी व्यवसायिकांसह कष्टकरी समाजाबद्दल त्यांनी विपुल लेखन केलं. गिरणीमध्ये दळण काढताना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले होते. निपाणी इथं काल त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी साहित्यासह विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते. श्रमसाधनेबरोबरच आपल्या साहित्यसेवेतून मराठी भाषेचं ऐश्वर्य वाढवणारा साहित्यिक आपण गमावला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**कुसाळे स्वागत**

कुठल्याही गोष्टीचं वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचं माझं स्वप्न असून एक दिवस ते मी निश्चितच साध्य करेन" असा विश्वास पॅरिस ऑलम्पिक नेमबाजी स्पर्धेतला कास्य पदक विजेता कोल्हापूरचा नेमबाज स्वप्निल कुसाळे यानं काल व्यक्त केला. कुसाळे याचं कोल्हापूरमध्ये आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आलं; त्यावेळी त्यानं उपस्थितांशी संवाद साधला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**